# उप वनसंरक्षक, यावल वन विभाग, जळगांव यांचे कार्यालय.

डि.एस.पी. चौक,आर.टी.ओ. ऑफीसजवळ, जळगांव ४२५ ००१
दुरध्वनी / फॅक्स क्रमांक ०२५७/२२६२७२२ ई-मेल :dcfyawal@ yahoo.com

तात्काळ

विषय:- वनजमीन-धुळे
हंडया-कुंडया साठवण तलावासाठी ३१.४९ हेक्टर वनजमीन वळती करणेबाबत..

जा.क्र.ब/कक्ष-५/जमीन/४९६ / सन २०२२-२३
जळगांव.४२५ ००१ दिनांक ५ /०७/२०२२.

प्रति,
म.वनसंरक्षक (प्रादे.),
धुळे

वनसंरक्षक (प्रादे.) ... कार्यालय 11 JUL 2022 2554

संदर्भ:- १. महाराष्ट्र शासन क्र.एफ एल डी १७२२/प्र.क्र.१२/फ-१०,महसूल व वनविभाग,मंत्रालय, मुंबई दि.१३/०६/२०२२.
२. या कार्यालयाचे पत्र क्र.ब/कक्ष-५/जमीन/८३०/सन २०२२-२३ दि.०५/०७/२०२२.
३. कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र. २, जळगांव यांचेकडील पत्र क्र.लपावि/प्रशा/२२९१/सन २०२२ दि.०५/०७/२०२२.

विषयांकीत प्रकरणी या वनविभागाच्या कार्यक्षेत्रातील हंडया-कुंडया साठवण तलाव क्षेत्र ३१.४९ हेक्टर वनजमीन वळती करणेबाबतचा प्रस्ताव योग्य मार्गाने शासनाकडे सादर करण्यात आलेला असून म. अवर सचिव, महाराष्ट्र शासन, मुंबई यांनी उपरोक्त संदर्भिय क्र. १ अन्वये काही मुददे उपस्थित केलेले असून सदर मुददयांची पुर्तता करणेबाबत सूचित केले आहे.

कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग, जळगांव यांना संदर्भिय क्र. २ अन्वये उपस्थित मुदयांची पुर्तता करणेबाबत कळविले असता, त्यांनी त्यांचेकडील संदर्भिय क्र. ३ अन्वये आवश्यक कागदपत्रकांसह मुददेनिहाय अहवाल या कार्यालयास सादर केलेला आहे. सदर अहवाल ४ प्रतीत पुढील आवश्यक त्या कार्यवाहीसाठी यासोबत जोडून सादर करीत आहे.

सहपत्र-वरीलप्रमाणे.

(पद्मनाभा एच.एस.)
उप वनसंरक्षक,
यावल वनविभाग,जळगांव.

-6 JUL 2022

प्रतिलीपी :- म. अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक व केंद्रस्थ अधिकारी, म. रा. नागपूर यांना संदर्भिय पत्र क्र.१ च्या अनुषंगाने माहितीस्तव सविनय सादर.
प्रतिलीपी :- कार्यकारी अभियंता, लघु पाटबंधारे विभाग क्र.२, जळगांव यांना माहितीस्तव सस्नेह अग्रेषित.

मा. अवर सचिव, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुबई, महाराष्ट्र शासन यांनी त्याचेकडील पत्र क्र एफ़एलडी-१७२२/प्र.क्र.१२/फ़-१० द्वारे उपस्थीत केलेल्या मुद्द्यांची पुर्तता.

| अ. न. | मुद्दे | पुर्तता |
|---|---|---|
| १ | सदर प्रकल्पासाठी किती वनेत्तर जमिन आवश्यक आहे? बुडीत क्षेत्रामधील वनजमीन / वनेत्तर जमिनीचा तपशील. | या प्रकल्पासाठी वनेत्तर जमिनीची आवश्यकता नसुन केवळ ३१.४९ हेक्टर वनजमिनीची आवश्यकता आहे तरी प्रकल्पात व बुडीत क्षेत्रामधील वनजमीन / वनेत्तर जमिनीचा तपशील सोबत जोडलेल्या तक्तामध्ये देण्यात आला आहे. |
| २ | मोठ्या प्रमाणात होणा-या वनांच्या नुकसानीच्या तुलनेत प्रकल्प अत्यावश्यक आहे किवा कसे? | हा प्रकल्प डोंगरी क्षेत्रात येत असुन या प्रकल्पामुळे २६४ हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली येणार आहे. हा प्रकल्प अतिदुर्गम आदिवाशी भागात प्रस्तावीत असुन जवळील गावांत पिण्याच्या पाण्यासाठी व शेतीसाठी दुसरा पर्याय नाही. |
| ३ | मोठ्या प्रकल्पा एवजी लहान योजना का राबविण्यात येत नाही? | सदर प्रकल्प मुळातच लघु प्रकल्प असुन साठवण तलाव आहे. या प्रकल्पाची साठवण क्षमता २.५८ द.ल.घ.मी. आहे.<br>या प्रकल्पामुळे 3 गावांना मौजे. देव्हारी, मोजे. देवझीरी व मेलाणे या गावांना पिण्याचे व सिंचनाचे पाणी मिळणार आहे. |
| ४ | Cost Benefit Analysis मध्ये वनांचे एकुणच पर्यावरणाचे होणारे नुकसान याबाबत वरिष्ठ स्तरावरुन पुन्हा तपासणी करावी व त्यानंतरच पुढील विचार करावा. | Cost Benefit Analysis मध्ये वनांचे एकुणच पर्यावरणाचे होणारे नुकसान याबाबत पुन्हा तपासणी करुन CBR 18.37 येत आहे. तरी मान्यतेसाठी सादर करण्यात येत आहे. |

स्थळः जळगांव
दि. /०७/२०२२

उपविभागीय अभियंता,
लघु पाटबंधारे सव्हे उपविभाग क्र. १,
जळगांव

कार्यकारी अभियंता,
लघु पाटबंधारे विभाग,
जळगांव